# प्रकरण पहिले

## ग्रामीण साहित्य आणि म. भा. भोसले यांची कादंबरी

# प्रकरण पहिले

# ग्रामीण साहित्य आणि म. भा. भोसले यांची कादंबरी

## प्रस्तावना

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये काही परिवर्तने झाली आणि साहित्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला विशेषतः स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या पंधरा-वीस वर्षाच्या काळात मराठी साहित्यात काही नवीन प्रवाह निर्माण झाले. त्यातलाच एक भाग म्हणून ग्रामीण साहित्याकडे पाहिले जाते. या प्रवाहाच्या पाठीमागे वैचारिक अशी काही एक बैठक देण्याचा प्रयत्न झाला. मात्र या चळवळीमागे सामाजिक व सांस्कृतिक भान अधिक होते.

या चळवळीतून ग्रामीण तरुणाला सृजनशील, संवेदनशील मनाला अंतर्मुख केले. आत्मभान दिले. नवशिक्षितांना तरुण साहित्यातील जीवन व प्रत्यक्षातील जीवन वेगळे जाणवले. कारण बहुजन समाजाचे तळागाळातील समाजाचे चित्रण करणारी साहित्यिक मंडळी बहुंशाने समाजाच्या वरच्या वर्गातील, उच्चवर्णीय, शहरातून आलेली असल्याने त्यांना या समाजाबद्दल आत्मीयता वाटली नाही. अशावेळी ग्रामीण भागातील जाणत्या संवेदनशील तरुणाला अनेक प्रश्न पडले की माझे जगणे व माझा समाज साहित्याचा विषय का होत नाही ? आमचे जीवन आमच्या जीवनातील समस्या, सुख-दुःखे यांना काहीच का अर्थ नाही ? या संदर्भाच्या शोधात असतानाच त्यांना आधार सापडला तो महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या थोर परिवर्तनवादी विचारवंताच्या विचारांचा. या विचारवंताच्या विचाराचा आधार घेऊनच त्यांनी आपल्या समाजासाठी लेखणी हाती घेतली आणि आपणच आपल्या व्यथा वेदनांना शब्दबध्द केले पाहिजे अशी उर्मी निर्माण झाली. यातूनच दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य इत्यादी प्रमुख प्रवाह साहित्यात निर्माण झाले.

' ग्रामीण ' या विशेषणाने रेखांकित झालेले साहित्य आज मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे तरीही या साहित्याच्या प्रेरणा, स्वरुप किंवा समस्या यांचे सविस्तर उपपादन करणारा समीक्षा ग्रंथ आजही उपलब्ध नाही. ग्रामीण साहित्याच्या तुलनेत मागून आलेल्या दलित साहित्यावर बरेच समीक्षा ग्रंथ पैदा व्हावेत आणि ग्रामीण साहित्याचा परामर्श घेणारे ग्रंथ संख्येने कमी असावेत हे तसे चमत्कारिकच नव्हे काय ? दलित साहित्याच्या भरतीची संगती लावणे अवघड नाही. पण ग्रामीण साहित्य समीक्षेच्या मंद वाटचालीची कारणे मात्र न उमगणारी आहेत.[१] अशी खंत व्यक्त केली जाते आणि ती योग्य आहे. तरीही या दिशेने प्रामुख्याने ग्रामीण कथाकार आणि कादंबरीकार आनंद यादव, डॉ. नागनाथ कोतापल्ले, द. ता. भोसले, वासुदेव मुलाटे, गो. म. कुलकर्णी या मान्यवर अभ्यासकांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

अशा ग्रामीण साहित्यातून मराठी माती आणि संस्कृतीचा आविष्कार होतो. समाजजीवनातील स्थित्यंतराचे प्रामाणिकपणे वास्तववादी रुप चित्रित करणारा हा प्रवाह आहे. देशीपणाचे वैभव मिरविणारा हा प्रवाह आहे. माणूस आणि निसर्ग, माणूस आणि देव यांच्यातील परस्पर नात्यांचा अमुलाग्र शोध घेणारा हा प्रवाह आहे. वास्तववादाला सामर्थ्य देणारा आणि एकूण मराठी साहित्याचे अनुभवविश्व व्यापक व समृध्द करणारा असा हा ग्रामीण या संज्ञेने ओळखला जाणारा वाङमयीन प्रवाह आहे.

आता या प्रवाहाच्या प्रेरणा आणि स्वरुप थोडक्यात पाहून ' ग्रामीण ' ही संकल्पना समजावून घेण्याचा प्रयत्न करु.

## ग्रामीण साहित्य म्हणजे काय ?

' ग्रामीण ' या विशेषणाने उल्लेखला जाणारा व मराठी साहित्यामध्ये ' ग्रामीण ' या नावाने परिचित असलेला साहित्य प्रवाह रूढ आहे. त्यातील ' ग्रामीण ' हे जे साहित्यासाठी विशेषण वापरले गेले. त्या संकल्पनेचा विचार या ठिकाणी या भागात करावयाचा ठरविला आहे.

ग्रामीण साहित्याच्या पूर्वपिठिकेचा अभ्यास करता या साहित्याची निर्मिती १९२५ पासून झालेली आढळते. त्याही आधीच्या कालखंडातील वाङमयात ग्रामीणत्त्वाच्या खुणा सापडतात. त्याचा शोध महात्मा फुले यांच्या शेतकऱ्याचा असूड (१८८३) व तृतीय रत्न (१८५५) या नाटकापर्यंत मागे नेता येतो. आनंद यादव यांनी हरिभाऊ आपटे यांच्या काळातच अपघाताने का होईना ग्रामीण साहित्याला प्रारंभ झाला असे म्हंटले आहे. ' काळ तर मोठा कठीण आला ' ही हरिभाऊंची गोष्ट, ग्रामीण जीवनाचा प्रत्यय देण्याचा प्रयत्न करते. प्रादेशिक कवींच्या कविता, ' पिराजी पाटील ' ही कादंबरी यामधून ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म दर्शन घडते. म्हणजेच साधारणत: आधुनिक साहित्याच्या प्रभावातच ग्रामीण साहित्याचा प्रारंभ झाला असे म्हणता येते.

ग्रामीण जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न कवितेमध्ये झाला. ' मीठ भाकर ' आणि ' सुगी ' या संग्रहातून अशी कविता संग्रहित केलेले दिसते. इंग्रजीतील ' पॅस्टोरल पोएट्री ' ही या कवितेपुढे आदर्श होती. मराठीत अशी कविता प्रारंभी ' गोप-गीते ', ' किसान गीते' या संज्ञांनी ओळखली जाऊ लागली. म्हणजेच प्रारंभी कवितेतून जरी ग्रामीण जीवन दर्शन घडविण्याचा प्रयत्न झाला असला तरी पुढे मात्र कथा आणि कादंबरी या वाङमय प्रकारामधून ग्रामीण जीवन चित्रण होऊ लागले. आज विपुल नसले तरी बरेचसे वाङ्मय हे ग्रामीण वाङमय म्हणून अवतरू लागले आहे. म्हणजेच १९२५ पासून आजतागायतचा कालखंड पाहिला तर शंभरएक वर्षांची परंपरा ' ग्रामीण ' साहित्याला असलेली आढळते. अशाप्रकारे समृध्द परंपरा असलेल्या ग्रामीण साहित्य संकल्पनेचा विचार करताना या साहित्यास लावलेले ' ग्रामीण ' हे जे विशेषण आहे त्यात नेमके काय अभिप्रेत आहे ? हे समजून घेणे आवश्यक आहे.

ग्रामीण या शब्दाचा संबंध हा ग्रामाशी आहे. ' ग्राम ' म्हणजे खेडे किंवा अनागर वस्ती शहराशिवायची वस्ती. हे ग्राम मुख्यत: गाववाड्यावर आधारित असते. तसेच तेथील जीवनही गावगाड्याने निबध्द असते. या गावगाड्यात जी माणसे राहतात त्या माणसांचे

प्रामुख्याने शेतकरी, बलुतेदार, अलुतेदार आणि फिरस्ते असे वर्गीकरण करता येते. व्यवसायाच्या भिन्नत्त्वावर हे वर्गीकरण अवलंबून असते. पारंपरिक गावाची ही रचना आहे,

अशा खेड्यातील बहुसंख्य माणसे शेतीचा व्यवसाय करतात. कारण खेड्यातील जीवन हे कृषिकेंद्रित जीवन आहे. शेती हाच या जीवनाचा केंद्रबिंदू आहे. या कृषिकेंद्रित जीवनाला शेती व्यवसायाला पूरक असे इतर व्यवसायही येथे चालतात. तसेच शेतीला व शेती व्यवसाय करणाऱ्या माणसांना आणि परस्परांना मदत करणारी मंडळीही येथे आहेत. उदा. सुतार, लोहार, चांभार हे शेतीस पूरक तर कुंभार, तेली, कोष्टी हे शेती व्यतरिक्त खेड्यातील माणसांच्या जीवनावश्यक गरजा भागवणारी मंडळी आहेत. अशा सर्व मंडळींनी मिळून खेडे बनते. एकूणच अशा खेड्यातील किंवा ग्रामातील ग्राम परिघातील ते सर्व ग्रामीण. ग्रामीण याचा अर्थ ग्रामाचे ग्रामातील, ग्रामविषयक ते सर्व आणि ग्रामीण जीवन म्हणत असताना खेड्याचे, खेड्यातील खेडवळ, खेड्यातील परिघात, संस्कारात संस्कारित असलेले खेड्यात राहणाऱ्यांचे, खेड्यात असणाऱ्यांचे, वाढणाऱ्यांचे जीवन म्हणजे ग्रामीण समुहाचे जीवन होय.

वरील विवेचन पाहता ' ग्रामीण ' या शब्दातून जो अर्थ व जीवन प्रतीत होते त्याचे चित्रण करणाऱ्या साहित्यासच 'ग्रामीण साहित्य ' म्हणावे का ? तसेच ग्रामीण साहित्य हे ग्रामपरिघातील ग्रामीणानेच ग्रामीणांसाठी ग्रामीणांबद्दल व ग्रामीणांकरीता लिहिले असेल तरच ते ग्रामीण साहित्य म्हणून ओळखावे का ? असा प्रश्न पडतो. तसे पाहता ' ग्रामीण' या विशेषणाने रेखांकित केलेल्या साहित्यामध्ये अनेक लेखकांनी लेखन केले आहे व आपल्या परीने ग्रामीण साहित्याचा अर्थ सांगण्याचाही प्रयत्न केला आहे. त्यामधील आनंद यादव ग्रामीण साहित्याबद्दल म्हणतात.

" खेडेगाव तेथील जीवनपध्दती, तेथील अशा रीती, शेती तेथील निसर्गाशी, मातीशी असलेली मानवी पण प्रदेशानिष्ठ वैशिष्ट्ये - मानवी जीवनाला त्याच्या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या

इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीतून जन्माला येणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य असे म्हंटले जाते.'' [२]

यामध्ये आनंद यादव यांनी गाव, प्रदेश तेथील मातीला महत्व दिले आहे. या मातीशी निगडीत मानवी जीवनातून उद्‌भवणाऱ्या समस्यात्मक अनुभूतीला ग्रामीण साहित्य म्हंटले आहे. म्हणजेच ग्रामजीवनातील कृषिकडे ते जास्त लक्ष देताना आढळतात. पण केवळ या गोष्टीचे वर्णन ज्यात आहे त्यालाच ग्रामीण साहित्य म्हंटले तर ते अपुरे ठरेल. कारण नागनाथ कोतापल्ले ग्रामीण साहित्याबद्दल म्हणतात.

'' ग्रामीण साहित्यातून ग्रामीण वास्तवातून निर्माण होणारे ते ग्रामीण साहित्य होय किंवा माणसाचे माणसाच्या मनोविश्वाचे व्यवहाराचे चित्रण करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य होय. ''[३]

याचाच अर्थ असा की कोतापल्ले केवळ ग्रामीण जीवनाची ओळख करून देण्यात समाधान न मानता ग्रामीण वास्तवतेचे मानवी मनाचा तळ शोधण्याचा, त्यांच्या मनाची गुंतागुंत सोडविण्याचा, त्यांच्या भाववृत्तीचा, मनोविश्वाचे चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न जेथे आहे त्याला ग्रामीण साहित्य म्हणताना दिसतात. म्हणजे हे चित्रण केवळ गावातील वेशीच्या आतील मानवाच्याच जाणीवा व्यक्त करते का ? याबद्दल नाही हेच उत्तर मिळेल. ग्रामीण साहित्य हे जसे गावाच्या आतील लोकांचे आहे तसेच ते गावाच्या बाहेरील माणसाचेही आहे. येथे वासुदेव मुलाट्यांचे मत लक्षात घेता येईल. ते म्हणतात, '' ग्रामीण साहित्य हे वेशीच्या आतील आणि वेशीच्या बाहेरील माणसांच्या गावातील व गावाबाहेरील अशा सर्व माणसांच्या जाणीवा व्यक्त करणारे साहित्य आहे. अनागर भागातील, खेड्यातील दलितांच्या जाणीवा प्रकट होत असतील तरी ते साहित्य ग्रामीण साहित्य होय.[४] यातून असे स्पष्ट होते की, वेशीआत आणि वेशीबाहेर मिळून गाव बनतो म्हणून वेशीआतील व वेशीबाहेरील ग्रामीण व दलितांच्या जाणिवा प्रकट करणाऱ्या साहित्यास ग्रामीण साहित्य म्हणावे.

वरील सर्व व्याख्या पाहता सर्व लेखकाच्या मताला कलाटणी देणारे मत मोहन पाटील मांडतात. ते ग्रामीण साहित्याबद्दल म्हणतात, " ग्रामीण साहित्य हे केवळ वर्णनात्मक विशेषण नसून ते साहित्यातंर्गत अभिव्यक्त होणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचेही निदर्शक आहे. म्हणून ग्रामसंस्कृतीचा भाषिक उद्‌गार ज्या साहित्यामध्ये एकपिंडत्वाने संवेदनशीलतेच्या पातळीवर जिवंत वास्तवदर्शी उमटतो त्या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हणावे." [५] या ठिकाणी मोहन पाटील यांनी ग्रामीण साहित्याच्या केवळ वर्णनात्मक विशेषणाला महत्व न देता, ग्रामीण भागातील कृषिसंस्कृती यांचे वास्तवदर्शी चित्रण जिथे मिळते त्याला ग्रामीण साहित्य असे म्हंटले आहे. म्हणजेच ' सांस्कृतिक ' ते विशेषणाला महत्व देताना दिसतात.

याचप्रमाणे भालचंद्र नेमाडे ही ग्रामसंस्कृतीला महत्त्व देताना दिसतात. ते म्हणतात, " ग्रामसंस्कृतीची ओढ आणि त्यातील आनंदतत्त्वाबद्दलची आस्था ग्रामीण साहित्यातून प्रकट होते." यामधून ग्रामीण साहित्यामागील प्रेरणाही अभावितपणे व्यक्त झालेली दिसते. ग्रामसंस्कृतीचा संवेदनशील उद्‌गार म्हणजे ग्रामीण साहित्य असा अर्थ प्रकट होत असेल तर कृषि संस्कृतीची प्रेरणाच ग्रामीण साहित्यामागे प्रभावी असणे स्वाभाविक वाटते. ग्रामीण साहित्यातून चित्रित होणारे ग्राम जीवन हे कृषिप्रधान असले तरी या गाववाड्यात कृषिशी साक्षात संबंध नसलेले इतरही अनेक घटक असतात. गावगाड्याचे ते अविभाज्य अंग असते. एकूण ग्रामीण जीवनातील कृषिविरहीत पैलूचाही विचार ग्रामीण साहित्यात करावा लागतो. उदा. श्रीनिवास कुलकर्णी यांचे ' डोह ' सारखे लेखन. हे लेखन कृषिनिष्ठ नाही पण त्यात वेगळ्या पध्दतीने ग्रामीण जीवनातील रुप, रस, गंध साक्षात झालेले आहेत. जी. ए. कुलकर्णी यांच्या काही कथातूनही ग्रामीणतेचा हा जिवंत स्पर्श आढळतो.

आधुनिकिकरणाच्या काळात ग्रामीण साहित्याचा अर्थ लावावयाचा झाल्यास असेही म्हणता येईल की, नवशिक्षणामुळे ग्रामसंस्कृतीपासून अलग झालेला नवविचारवंताचा नव लेखकांचा वर्ग ज्याला स्वत:चे वा इतरांचे आजच्या पर्यावरणातील जे ग्रामीण जीवन जाणवते त्याचे दर्शन आजचा ग्रामीण लेखक प्राधान्याने घडवित असतो. एकूणच आजचे वा कालचे

ग्रामजीवन, त्याचे मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदन सखोलपणे आणि सर्वांगीण स्वरुपात ज्यात व्यक्त होते अशा साहित्यास ग्रामीण साहित्य म्हणता येईल. आजच्या आधुनिक युगातील जीवन व्यवहाराचे परीक्षण करता वरीलप्रमाणे ग्रामीण साहित्याचा अर्थ लावल्यास तो चुकीचा ठरणार नाही.

वरील प्रत्येक अभ्यासकांच्या मताचा विचार करता हा विचार ग्रामीण साहित्याचा अर्थ स्पष्ट करण्यास परिपूर्ण ठरत नाही. याचाच अर्थ कोणतीही व्याख्या साहित्याचा अर्थ स्पष्ट करण्यास परिपूर्ण ठरतेच असे नाही. परंतु एकंदरीत वरील सर्व मतांचा विचार करता असे स्पष्ट होते की, ग्रामीण साहित्य ही संकल्पना एखाद्या प्रदेशातंर्गत जीवनातून निर्माण झालेल्या साहित्याला योजली जाते. त्या साहित्यात त्या प्रदेशातील वास्तव जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. साहित्यिकाच्या प्रदेशनिरपेक्ष व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यात गौणस्थानी असतो. त्यामुळे ग्रामीण साहित्यात मनाचा समुहाचा व समाजाचा अनेक ताणतणावासह शब्दरूप झालेला एक सांस्कृतिक ठेवा असतो. तो त्या प्रदेशाचा चालता बोलता मानसिक इतिहास असतो.

एखाद्या प्रदेशांतर्गत जीवनातून निर्माण झालेल्या साहित्यास ग्रामीण साहित्य म्हंटले जात असेल तर ' प्रादेशिक ' आणि ' ग्रामीण ' या संज्ञा एकाच स्वरुपाच्या साहित्याला लावता येण्यासारख्या आहेत असे मानता येईल. प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्व देत नाही तर ते महत्त्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाला समग्र टप्प्याला. प्रादेशिक साहित्यात प्रदेशाचे जीवन चित्रण त्यात अटळ होऊन बसते. तसेच त्या प्रदेशातील शहरी जीवन चित्रण होऊ नये अशीही अपेक्षा असते. म्हणून प्रादेशिक साहित्य हे एकअर्थी ग्रामीण साहित्यच असते.

' ग्रामीण साहित्य ' या नावाखाली लिहिले जाणारे साहित्य आत्मिक आविष्कार आणि वास्तव जीवन यांचा संलग्न विचार व्यक्त होऊन लिहिले जाणारे साहित्य असते. ग्रामीण लेखक त्या साहित्याची निर्मिती करताना त्या वातावरणाशी त्या माणसाशी त्यांच्या विचारांशी त्यांच्या मनाशी एकूणच त्यांच्या संपूर्ण जीवनाशी एकरुप झालेला असतो.

लेखकाची संवेदनशीलता ही काळानुरुप बदलत असते. आधुनिक काळात ग्रामीण लेखकाची संवेदना लक्षात घेऊन जर ग्रामीण साहित्याचा अर्थ सांगावयाचा झाल्यास असे म्हणता येईल की, नवशिक्षणामुळे ग्रामसंस्कृतीपासून अलग झालेला नव-विचारवंताचा, नव लेखकांचा वर्ग ज्याला स्वत:चे व इतरांचे आजच्या पर्यावरणातील जे ग्रामीण जीवन जाणवते त्याचे दर्शन आजचा ग्रामीण लेखक प्राधान्याने घडवित असतो. एकूणच आजचे वा कालचे ग्रामजीवन, त्याचे मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदन सखोलपणे आणि सर्वांगीण स्वरुपात ज्यात व्यक्त होते असे साहित्य, म्हणजे ग्रामीण साहित्य होय. म्हणजेच काळानुरुप ग्रामीण साहित्याचे संज्ञा स्वरुप ही बदलत असलेले आढळते.

‘ ग्रामीण ’ या विशेषणाखाली लिहिलेल्या गेलेल्या साहित्यास ‘ ग्रामीण साहित्य ’ का म्हणावे ? असा प्रश्न जेव्हा उभा राहतो. तेंव्हा त्याच्या समर्थनार्थ असे म्हणता येईल की साहित्य हे मानवी समाजाचे मानव वर्तणुकीचे प्रतिबिंब दाखवते. असे चित्रण करणाऱ्या साहित्याचा पदर असलेल्या काही कथा, कादंबऱ्या मात्र विशिष्ट मातीशी, तेथील जीवनानुभुतीतून निर्माण होणाऱ्या समस्येशीच निगडीत असतात. म्हणजेच त्या कृषिसंस्कृती भोवती फिरताना दिसतात. ही कृषि संस्कृती ग्रामीणत्वाचे प्रमुख अंग आहे. तसेच ते एक स्वतंत्र वैशिष्ट्यच आहे. याचा अनुभव साहित्यातील इतर प्रवाहाशी तुलना करता आढळून येईल.

आधुनिक मराठी साहित्यात विविध प्रवाह आहेत त्यामध्ये ग्रामीण साहित्याचा प्रवाह हा प्रमुख आहे. आधुनिक काळात ग्रामजीवनामध्ये अधिकाधिक शहरीकरणाचा शिरकाव होत असला, खेडी बदलत असली तरी हा बदल भौतिक स्वरुपाचा राहणार आहे. त्यामुळे ग्रामीणांची मानसिकता थोडीफार बदलेल तेंव्हा बदललेली ग्रामीण मानसिकता नव्या ग्रामीण साहित्यामध्ये उमटेल असे म्हणता येते.

## ग्रामीण साहित्याचे वेगळेपण

जगाच्या पाठीवर मानव समाज एक आहे. मग तो मानव कोणत्याही वंशाचा असो. तसेच त्यांच्या वासना-विकार, प्रवृत्ती, माणुसकीची, उदात्ततेची ओढ, सौजन्याने इतरांशी

वागण्याचा कल, आशा-आकांक्षा व स्वप्ने उराशी धरुन जीवन जगणे इत्यादी बाबी मुलभूत आहेत. या बाबीच ह्या साहित्याच्या मूलाधार मानल्यास मग ग्रामीण साहित्य हेच इतर साहित्यापेक्षा वेगळे कसे ? यात नेमके वेगळेपण आहे का ? तसे पाहिले तर सर्व साहित्याचा केंद्रबिंदू मानवी जीवन हाच असेल किंवा मानव हा इथून तिथून भावभावनांनी सुखदु:खानी एकच असेल तर ग्रामीण आणि नागर अगर देशी व विदेशी असा भेद कशासाठी असाही प्रश्न उपस्थित केला जातो.

आजही आपल्या देशातील ८०% जनता खेड्यापाड्यातून राहते. तेंव्हा या ग्रामीण भागातून सर्वदूर पसरलेल्या समाजाची स्वत:ची अशी एक संस्कृती निर्माण झालेली दिसेल. परंतु ग्रामीण भागाच्या तुलनेत शहर हे सुसंस्कृत, समृध्द व वेगवेगळ्या उद्योगांनी गजबजलेले आणि विविध व्यवहारांनी जटील बनलेले असते. तसेच येथील शहरी स्वरुप जगडव्याल व्यवहारांनी भरलेले वैताग, खोटेपणा यांनी भरलेले असते. त्याचप्रमाणे ते समृध्दीचेही केंद्र असते. असे असले तरी ग्रामीण व शहरातील अंतर वाढले आहे. कारण भारतीय ग्रामीण विभागातील खेड्याची रचना आणि संस्कृती ही शहराच्या भौगोलिक रचना व संस्कृतीपेक्षा मूलत: भिन्न आहे.

जुन्या खेड्याची रचना ही एका विशिष्ट अशा पध्दतीनेच होती. गावातील रस्ते कसे असावेत, घरे कशी असावीत, पाटलाचे घर कुठे असावे, मंदिर कुठे असावे इत्यादी बाबतीतील गावाची रचना परंपरेने चालत आलेली आहे. अशा प्रकारच्या रचनेचे आठ प्रकार होते हे ही श्री. शुक्ल यांनी सांगितले आहे.[६] अशी रचना नगरात आढळतेच असे नाही. मात्र ग्रामीण भागात ही रचना परंपरेने चालत येते. त्याप्रमाणे या अंतररचनेशी संबंधित अशी ग्रामसंस्कृतीही होती. म्हणजेच रचनेनुसार किंवा प्रदेशानुरुप जे नागर ग्रामीण संस्कृतीचे जे भेद आहेत ते पाहता हे लक्षात येते की, नागरी भागातील मनुष्य हा शहरी वातावरणात वाढलेला असतो तर ग्रामीण भागातील व्यक्तीवर खेड्यातले संस्कार असतात. म्हणजेच त्या त्या भागातील वातावरणाचा संस्कृतीवर परिणाम मनुष्यावर पडत असल्याने ग्रामीण भागातील व्यक्तीला

शेतकाम करणारा नांगरगठ्ठ्या म्हंटले जाते. तसेच याला नोकरी जमायची नाही अशीही शंका घेतली जाते. शहरी भागातील मनुष्य हा चाकरमानी आहे असे समजले जाते. त्याला शेतकाम जमणार नाही अशी मते व्यक्त होतात. तसेच यावर कोणी अशीही शंका घेईल की एकेकाला सगळंच जमतं म्हणजे हा शहरात गेला तर शहरी वागेल आणि खेड्यात गेला की खेडुतासारखा वागेल. परंतु असे जीवन जगणारे लोक जास्त मिळतीलच असे नाही आणि जे असे वागण्याचा प्रयत्न करतात ते परिस्थितीनुरुप जगण्याचे नाटकच करीत असतात असे म्हणावे लागते.

खेड्यातील शेतकरी आजही शेती माझा धर्म आहे असे उद्‌गार काढताना आढळतो. कारण त्याच्या हाडामांसात त्या मातीची संस्कारशीलता खिळलेली आहे. म्हणजेच ग्रामीण भागातील परंपरेतून, मातीतून, हातातील कामातून तेथील संस्कृतीतून जीवनविषयक एक धारणा संवेदना निर्माण होते जी जन्मत: असते. याचाच अर्थ ग्रामीण संस्कार हा वेगळा भाग आहे हे सूचित होते. याच ग्राम संस्कृतीचे दर्शन आपल्याला ग्रामीण साहित्यातूनच होत असलेले आढळले.

ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने प्राचीन काळापासून कृषिकेंद्रित आहे. आज खेड्यापाड्यातून परिवर्तनाला प्रारंभ झाला आहे. परंतु परिवर्तन झाले तरी कृषिकर्म हे ग्राम संस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट्य राहील यात शंका नाही. म्हणूनच कृषिजीवन आणि शेतकरी हा ग्राम संस्कृतीचा प्रमुख घटक पूर्वी पासूनच राहिलेला आहे. हा संपूर्ण ‘ गावगाडा ’ शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून निर्माण झाला असेच दिसेल. या संदर्भात त्रिं. ना. आत्रे म्हणतात, “ कुणबी पुढे झाल्यावाचून एकाही खेड्यात वसाहत झाली नाही. त्याने धान्य पैदा करुन इतरांच्या खाण्याची तरतुद केली तेंव्हा ते (बलुतेदार, कारु-नारु, फिरस्ते) गोळा झाले.” [७]

ग्रामजीवनात विविध घटक आणि विविध स्तर परस्परपूरक असल्यामुळेच तेथे कृषिकेंद्रित अशी स्वतंत्र संस्कृती निर्माण झाली. कृषी जीवनाशी निगडीत सण उत्सव साजरे

केले जातात. पोळा, दसरा, अक्षयतृतीया, गुढीपाडवा या सगळ्याच सणांना शेती संस्कृतीमध्येच महत्व आहे. पुराणकथामधून या सणांबद्दल कुठल्याही कथा येवोत. परंतु त्यांना खरेखुरे महत्व आहे ते कृषी संस्कृतीच्या संदर्भात. म्हणजे पुराण काळापासून शेती हा केवळ उपजिविकेचा व्यवसाय नसून त्या पलीकडे जाऊन काही भावबंध निर्माण झाले. त्यानुसार मग संस्कृतीची जडणघडण होत गेली व अनेक विधी निर्माण झाले. या संपूर्ण विधीला कृषी जीवनामध्ये निश्चित असा अर्थ असल्याचे दिसते. जसे दसऱ्यातील विधीला अर्थ आहे तसा नागपंचमीला होणाऱ्या वारुळाच्या पूजेलाही असाच संदर्भ आणि अर्थ आहे. येथे वारुळ हे भूमातेचे प्रतिक आहे. ही संपूर्ण संस्कृती कृषी जीवनाशी निगडीत असल्याने ती ग्रामीण भागात दिसून येते. शहरात अशा प्रकारची संस्कृती आढळत नाही.

नागरी जीवन कृषिकेंद्रित नसल्याने तेथील उद्योग व्यवसायानुसार तेथील जीवन आचरण व संस्कृती तयार झालेली आढळते. संस्कृतीमध्ये सामुहिक सहकृती असते. या सहकृतीमध्ये धर्माधिष्ठित तत्व, आचार, आहार, पोशाख, प्रथा, परंपरा पाळत असतात. म्हणून संस्कृती म्हणजे मानवी समुहाची वैशिष्ट्यानिशी जगण्याची एक जीवनशैली असते आणि तोच तिचा जीवनधर्मही असतो. या विचारवंताच्या आधारे ‘ ग्रामव्यवस्थेत ’ परस्पर सहकार्य करीत जगण्याची एक जीवनशैली असते. त्याकरीता ‘ग्रामात ’ म्हणजे गावगाड्यात अनेक व्यवस्थांचे जाळे असते हे सांगता येईल. त्याचप्रमाणे शहरात नगरात राहणाऱ्या पोटसमुहाची आणि गावात राहणाऱ्या पोटसमुहाची माणूस म्हणून जगण्याची रीत ही एकजिनसी एकाच शैलीची म्हणून व्यापक अर्थाने एका संस्कृतीची दाखवता येत नाही. हा मुलभूत फरक ‘ ग्रामीण माणूस ’ ‘ शहरी माणूस ’ या दोघांत दाखवता येतो.

सांस्कृतिक वातावरणातून जी मनोवृत्ती बनते त्यात ‘ शहरी ’ मनोवृत्ती वेगळी असते आणि ती तिथल्या व्यक्तिगत गरजेतून तयार होते असे दिसते. शहरी माणूस संकुचित मतलबी गतीशील व चंगळवादी असतो. तसेच त्याला नित्य नवे हवे असते. त्यामुळे संवेदना निबर बोथट बनत जातात. हे सर्व त्याच्याभोवती असणाऱ्या असुरक्षित उद्यमशील स्पर्धात्मक आणि वैविध्यपूर्ण अशा यंत्रणेमूधन शिकायला मिळते.

याउलट ग्रामीण माणूस झगडणारा दैववादी परंपरानिष्ठ नव्या बदलाने अचंबित होणारा व जुने तेच सोने मानणारा असा भाबडी संवेदना जपणारा असतो. त्याच्या भाबडेपणातही प्रामाणिकता असते. अर्थात हा भेद सर्वसाधारण असून नेमका असाच काटेकोरे भेद असतोच असा दावा करता येत नाही.

रा. ग. जाधव म्हणतात, " जेव्हा जीवनाचे ग्रामीण आणि नागरी दोन भाग मग ते कशामुळे आणि कोणत्याही कारणामुळे असोत उघड उघड पडलेले दिसतात. तेंव्हा ग्रामीण साहित्याचा उगम न होणे असंभवनीयच. ग्रामीण वाङमयाच्या निर्मितीला प्रेरणा देणारी महान शक्ती म्हणजेच नागरी जीवनापासून ग्रामीण जीवनाची असलेली प्रकृती भिन्नता होय."[८] या विवेचनात खेडूत व शहरी माणसाच्या जीवन पध्दतीत व प्रकृतीतही फरक असतो हे निसंदिग्ध शब्दात स्पष्ट झाले आहे.

निसर्गाच्या लहरीपणामुळेच शेतकरी आणि कृषि संस्कृतीशी निगडीत असणारा माणूस दैववादी बनण्याची शक्यता आहे. एकीकडे गावगाड्याशी नाते व दुसरीकडे निसर्गावर अवलंबून राहणे यातून त्याचे मन आदिमतेकडे झुकले तर आश्चर्य नाही. ही आदिमता नागरी माणसाला नीटशी कळत नाही. म्हणूनच रुढ मराठी समीक्षा ' ग्रामीण माणूस म्हणजे अज्ञानी, रुढी, परंपरा जपणारा याचे चित्रण तिथे येते ते ग्रामीण साहित्य असे मानले जाते. खरे म्हणजे कृषि संस्कृतीची रचनाच अशी असते की ग्रामीण माणूस आदिमतेकडे झुकतो. त्यामुळेच संपूर्ण निसर्ग त्याला देव वाटण्याची शक्यता असते. म्हणजे कृषि संस्कृतीत वाढणारे वावरणारे मन सतत आदिमतेशी देवदेवतांशी बांधला जाण्याची शक्यता असते. येथे ग्रामीण माणूस अज्ञानी अडाणी नसतो. तो एका विशिष्ट संस्कृतीचे अपत्य असतो म्हणूनच त्याच्या मनात लोकभ्रमांना, लोकरुढींना, लोकविधींना, लोक समजूतींना अतिशय महत्वाचे स्थान असते. अर्थात पुन्हा सर्व बाबींना ग्रामसंस्कृतीमध्ये संदर्भ असतात. म्हणजेच कृषी संस्कृतीमध्ये निसर्गानेच आदिमताही टिकवून ठेवली आहे. अशी कृषिकेंद्रित लोकजीवन निसर्गाशी आदिम स्वरुपाची बांधिलकी या संस्कारातून निर्माण झालेली ग्रामीण संवेदनशीलता या गोष्टी ग्रामीण साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करतात. हे आवर्जुन लक्षात घ्यायला मदत होईल असे वाटते.

आता या तात्विक विचाराच्या पार्श्वभूमीच्या आधाराने कादंबरीकार म. भा. भोसले यांच्या कांदबरीतील ग्रामसंस्कृतीचे दर्शन अभ्यासता येईल. तत्पूर्वी कादंबरीकार म. भा. भोसले यांचा लेखक आणि माणूस म्हणूनचा परिचय या पुढील विवेचनात करुन देण्याचा प्रयत्न आहे.

## कादंबरीकार म. भा. भोसले

### प्रस्तावना

मागील भागात आपण ग्रामीण साहित्याच्या संकल्पनेचा विचार केला. या पुढील भागात आपणास कादंबरीकार म. भा. भोसले यांच्या व्यक्ती आणि वाङमयाचा परिचय करुन घ्यावयाचा आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये कादंबरीकार म. भा. भोसले यांच्या ' समरांगण ' व 'उघड्या जगात ' या दोन कादंबऱ्यात प्रतिबिंबीत झालेल्या ग्रामीण संस्कृतीचे चित्रण अभ्यासावयाचे ठरवले आहे. ते अभ्यासण्यापूर्वी म. भा. भोसले यांचे व्यक्तिमत्व, त्यांचे वाङमयीन कर्तृत्व व त्यांच्यातील कादंबरी लेखक यांचा परिचय करुन घ्यायचा प्रयत्न आहे.

आज ग्रामीण साहित्याची समृध्द परंपरा निर्माण होत आहे. शिलेदारांची साहित्य शिल्पे प्रकाशात आणली तर ' ग्रामीण साहित्य ' मराठी साहित्यातील एक सुंदर शिल्प ठरेल की ज्या शिल्पात समृध्दतेचे सांस्कृतिकतेचे संस्काराचे व विकासाचे आविष्कार त्यात आढळतील. या ग्रामीण साहित्याचा ऐतिहासिक व वाङमयीन परंपरेत भर घालणारे एक बावनकशी शिल्प म्हणून म. भा. भोसले यांचा उल्लेख करावा लागेल.

म. भा. भोसले यांचा औदुंबर या पवित्र तीर्थक्षेत्राजवळ असणाऱ्या धनगाव या गावी १५ जुलै १९१४ रोजी जन्म झाला. त्यांचे संपूर्ण नांव - मल्हारराव भाऊराव भोसले असे आहे. सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला येऊनही जिद्द, असीम कर्तृत्व आणि आत्मविश्वासावर

त्यांनी आपले सातवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. अत्यंत गरीब कुटुंबात लेखकाचा जन्म झाला. तरी त्यांचे मन फार मोठे होते. सद्‌भावना आदर्श होती आणि संस्कृती उच्च होती. त्यांनी स्वत: हालअपेष्टा सहन केल्या. परमावधीचे कष्ट उपसले पण इतर जिवांचे सोडून द्या पण एखाद्या मुंगीला सुध्दा आजन्म दुखावले नाही. मला हा वारसा मिळाला.[९] हा वारसा घेऊन दारिद्रयाचे भांडवल न करता ' आम्हा घरी धन ', ' शब्दाचीच रत्ने ' असे गौरवाने अभिमानाने म्हणत मराठी साहित्यात आपली म्हणून नाममुद्रा उमटविणारे म. भा. भोसले १९३० साली सातवी परीक्षेमध्ये सातारा सेंटरला पहिल्या क्रमांकाने पास झाले.

ओढग्रस्त असलेल्या शिक्षणाचा वारसा नसणाऱ्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या म. भा. भोसले यांनी इंग्रजी शिक्षण पूर्ण करुन काहीतरी वेगळे करण्याची इच्छा होती. परंतु घरच्या परिस्थितीमुळे आर्थिक कुचंबणा झाली. सामान्यत: ग्रामीण, खेडूत कुंटुबातील शिक्षण घेणाऱ्या त्यांच्या काळातील मुलांप्रमाणेच त्यांनाही ध्येय व्यापक ठेवूनही ते गाठता आले नाही. परिस्थितीच्या चक्रात सापडल्याने ते शेतीकडे वळले. शेती करत असतानाच त्यांच्या मनात पोलीस खात्यात जाऊन फौजदार व्हावे अशी इच्छा बळावली होती. पण शिक्षणासाठी फी भरणे, बोर्डिंगला राहणे हे अशक्य होते. त्यामुळे शिक्षणाचा नाद सोडावा लागला. पण याच कालावधीत सातवीचे काही नंबर ट्रेनिंगसाठी घेत असल्याने त्यांना तसा हुकुम आला. ट्रेनिंगसाठी एक वर्षे ' नारायणगाव ' या गावी राहिले व नंतर त्यांची स्वत:च्या गावाजवळ ' भिलवडी ' येथे शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली.

## म. भा. भोसले यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

म. भा. भोसले हे एक सिध्दहस्त ग्रामीण साहित्यिक होते. ग्रामीण साहित्याच्या प्रांतामध्ये त्यांचे स्थान महत्वपूर्ण आहे. जन्मत:च प्रतिकूल परिस्थिती आणि पुरेशी साधने लागतात ती माणसे अल्पावधीत कीर्ती मिळवून प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर पोहोचतात. काही माणसे कर्तृत्ववान परंतु दुबळी असतात. त्यांना नशीब साथ देत नाही. परिस्थिती साथ देत नाही. कुणाची साथ मिळत नाही तरीही ती माणसे घरच्या हालाखीच्या परिस्थितीवर

आपल्या स्वप्रयत्नाच्या बळावर व आत्मविश्वासाच्या जिद्दीवर जीवनात येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला तोंड देतात आणि काहीतरी नवनिर्मिती करतात. अशा प्रमुख व्यक्तीमध्ये म. भा. भोसले यांचे नाव घेतल्यास ते वावगे होणार नाही.

कादंबरीकार म. भा. भोसले यांची चरित्र-चारित्र्याची तथा वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण आपल्या देशातील गांधी युगाच्या अपूर्व पर्वात झाली. मराठी वाङमयाच्या दृष्टीने तो कालखंड फडके-खांडेकर युगाचा कथा कादंबरी नाट्याचा होता. स्वातंत्र्याची चळवळ ऐन भरात होती. मार्क्सवाद, फ्राईड, डार्विन, नवमतवाद, गांधीवाद, अस्पृश्यता निवारण, स्त्री स्वातंत्र्य यासारख्या नाना विचारप्रणालींची जोरदार चर्चा समाजात घडत होती. ' खेड्यांकडे चला ' या संदेशाने सर्व समाज अंतर्बाह्य भारलेला होता. अशा परिस्थितीत भोसल्यांच्या व्यक्तिमत्वातील माणूस व लेखकही दोन्ही या कला प्रेरणांनी व प्रवृत्तींनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे घडत होता. भोसले यांना साहित्यनिर्मिती म्हणजे करिअर वाटली नसून समाजसेवा वाटे. अवतीभोवतीच्या आपल्या वास्तवतेचे अनुभवविश्व म्हणूनच त्यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यातून कटाक्षाने साकारले. त्याविषयी एके ठिकाणी ते प्रांजळपणाने स्वतःच बोलून दाखवतात. " माझ्या लेखनातील सगळ्या कल्पना मला प्रत्यक्ष जीवन अनुभूतीतून मिळाल्या आहेत आणि त्या तशा मिळाल्या म्हणूनच कुठलीही अनुकूल परिस्थिती नसताना मी लिहू लागलो. असे त्यांनी म्हंटले आहे. म्हणूनच वि. स. खांडेकरांनी " भोसले यांच्या लेखणीचे बळ त्यांच्या वास्तव दृष्टीकोनात आहे. "[१०] असे प्रमाणपत्र दिले आहे.

म. भा. भोसले यांच्या जीवन प्रवासाकडे दृष्टीक्षेप टाकता अत्यंत गरीब व प्रतिकूल परिस्थिती असलेल्या सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्माला आल्याने त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाला चालना मिळत गेली. सातवी झाल्यावर पुढील शिक्षणाची सोय होईना म्हणून त्यांनी शेतकरी पेशा पत्करला. पण जीवनाला मिळालेल्या अनपेक्षित कलाटणीमुळे ते शिक्षकी पेशाकडे वळले. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, " मला व्हायचे होते शेतकरी. व्हायचं कसलं मी शेतकरी होणार हे अगदी ठरुन गेलेले होते. पण माझा तो प्रवास चुकला अन् दुसऱ्या प्रवाहात मी सापडलो."[११]

म. भा. भोसले ज्या कुटुंबात जन्मले तिथे कोणतेही शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरण नव्हते. वाङ्मयीन कार्यास पुरक असे कथा, कादंबऱ्या, मासिके इतकेच नव्हे तर साध्या कागदाच्या कपट्याचाही वापर नव्हता. ते सहावी इयत्तेत असताना कृ बा. बाबर हे मुख्याध्यापक म्हणून होते. ते स्वत: लेखक असल्याने भाषा निबंध उत्तम शिकवित. त्याचप्रमाणे त्यांनी बालवाङमयाची काही पुस्तके शाळेत आणल्याने ती भोसले यांच्या वाचनात आली. त्यावर त्यांनी बक्षिसेही मिळविली. सातवीमध्ये त्यांना ट्रेनिंगला हुकुम आला. ट्रेनिंगनंतर ते मास्तर म्हणून रुजू झाले तोपर्यंत त्यांना मराठीतल्या लेखकासंबंधी व एकूणच मराठी वाङमयासंबंधी काहीही माहिती नव्हती.

म. भा. भोसले यांना वाङ्मयाची गोडी लागली ती सुध्दा योगायोगानेच. १९३४ सालच्या दिवाळी सणात सांगलीला गेले असता ‘ हिंदोळ्यावर ’ हे पुस्तक त्यांनी विकत घेतले ते एकाच बैठकीत वाचून संपविले. यातून त्यांना ग्रंथ वाचनाचा छंद लागला आणि त्यातून खांडेकर, फडके या नावांबद्दल आकर्षण वाटू लागले. पुस्तकांचे खूप वाचन झाल्यावर पुढे पुढे लिहिण्यास ते प्रवृत्त झाले. याच दरम्यान त्या काळी वाङमयीन क्षेत्रात लौकिकपात्र असलेले ‘ किर्लोस्कर ’ मासिक त्यांच्या वाचनात आले. त्यातल्या कथा, कविता, लेख त्यांना आवडू लागले व ते त्या मासिकाचे वर्गणीदार झाले. या मासिकाच्या वाचनामुळे ना. सी. फडके व वि.स.खांडेकर हे प्रतिभा संपन्न लेखक अतिपरिचित झाले.

म. भा. भोसले यांची आयुष्याची वाटचाल प्रतिकूलतेतून झालेली होती. स्वत:च्या प्रतिकूल परिस्थितीतून इतरांना अनुकूल परिस्थितीकडे नेणे हा गुरुजींच्या जीवनाचा गाभा होता. अत्यंतिक सोशिक वृत्ती, सुख दु:खाचा कधीही बाजार न मांडता इतरांच्या दु:खानी अवस्थ होणारे. तसेच संवेदनक्षमवृत्ती, वाचनाची अभिरुची, भोवतालच्या परिसराचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्यांच्या जोडीला सर्जनशील प्रतिभा यातून त्यांच्या लेखनाची वीण तयार झालेली दिसते. भोसले गुरुजी आपल्या लेखन साधनेबद्दल सांगत असत की, “ स्वत:पेक्षा दुसऱ्याचा विचार अधिक करणारा, दुसऱ्याच्या दु:खात तळमळणारा, हळहळणारा व दुसऱ्याच्या

आनंदाने बेहोष होणारा आत्मा ज्याला लाभला आहे. असा कुणीही मनुष्य जर तो अक्षर शत्रू नसेल तर कवी किंवा लेखक बनलाच पाहिजे."[१२]

ग्रामीण भागात धनगावसारख्या खेड्यात भोसले यांचा जन्म झाला. बराच सेवाकाळही याच परिसरात गेलेला. त्यामुळे ग्रामीण जीवनाची त्यांना अचूक जाण आणि भान आहे. ग्रामीण जीवनातील चढउतार त्यांनी स्वत: अनुभवलेले आहे. ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करुन त्यांनी आपल्या कलाकृती निर्माण केल्या म्हणून ते म्हणतात, " जे जीवन मी जगत होतो त्या जीवनाबद्दल माझ्या मनात जिव्हाळा होता. त्या जीवनात मला दु:खाचे आणि सुखाचे अनेक क्षण बघावयास मिळाले. ते हृदयावर कोरुनच मला लेखनातील सगळ्या कल्पना मला प्रत्यक्ष जीवनाच्या अनुभूतीतून मिळाल्या आहेत.[१३]

ग्रामीण भागाचे अतिशय तळमळीने चित्रण करणारे म. भा. भोसले हे एक जेष्ठ साहित्यिक होत. त्यांनी ग्रामीण कथा, कादंबरी, नाटक चित्रपट, बालवाङमय या क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. ग्रामीण भागात वावरताना लेखन करताना त्यांना सामाजिक जीवनाची जाणीव आहे. खेड्यात वावरणाऱ्या प्रत्येक माणसाच्या अंत:करणापर्यंत ते पोहोचले आहेत. अशिक्षित उपेक्षित यांच्या दु:खाबद्दल त्यांचे मन तळमळते, व्याकूळ होते, त्यांचेवर त्यांना असणारा स्वत:चा हक्क मिळावा म्हणून ते काही उपायही सुचवतात. सावकारांचा मुलगा सावकारीविरुध्द लढतो व लोकांना हक्क मिळवून देतो हे त्यांनी पाहिलेले आहे व त्यांना वाव देण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या लेखनातून केला आहे. याचबरोबर ग्रामीण जीवन व ग्रामीण भागातील शिक्षणाविषयीच्या तळमळीतून जे लेखन केले त्याला यशही मिळत होते. त्यांनी बऱ्याच शाळातून विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने भाषणे दिली आहेत. विटा येथे गणपती उत्सवात ' जीवन निष्ठा ' या विषयावर दिलेले व्याख्यान गौरवपूर्ण ठरले. सांगली येथे ' महात्मा गांधी ' वसतिगृहाच्या स्नेहसंमेलन प्रसंगी त्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण म्हणजे विद्यार्थ्यांना केलेला प्रेमळ उपदेशच होता. या साऱ्या प्रवासातून भोसले यांचे वाङमय सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचत असे. तसेच त्याचा व्यक्तिमत्त्वाला आकार प्राप्त होऊ लागला होता.

म. भा. भोसले यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, अनुभव, स्व-जाणीव, स्वानुभवातून घडली गेली. पूर्व ओळख नसतानाही त्यांच्या ' खिलारी जोडी ' या कथेचे मर्म जाणणारे शंकर भाऊ किर्लोस्कर, ' मुक्कामार ' कथेचे हस्तलिखित वाचून अभिनंदन पत्र लिहिणारे मामा वरेरकर, भोसलेच्या वाङमयाचा आपल्या भाषणातून वारंवार उल्लेख करणारे गोपीनाथ तळवलकर ' गार सावली ' या कथा संग्रहास प्रस्तावना लिहिणारे श्री. के. क्षीरसागर त्यांच्या वाङमयीन वृत्तीबद्दल बक्षिस देणारे ग्वाल्हेर सरकार या साऱ्यांनी त्यांच्या लेखनामागे पाठबळ उभे केले.

म. भा. भोसले यांचे जीवन म्हणजे साधना नव्हे तर एक खडतर तपश्चर्या होती. दारिद्रयाचा कठोर कातळावर बसलेल्या या व्रतस्थाची तनमनात रुजलेली मानवता सजग राहिली. त्या सजगतेने ग्रामीण जीवन हाच आत्मा आहे असे मानलं आणि ग्रामीण जीवनाला साहित्य क्षेत्रात अमाप उंची प्राप्त करुन दिली. म्हणून हा व्रतस्थ उपासक महापुरुष हाच ग्रामीण साहित्याचा मजबूत पाया घालून देणारा आहे असे वाटते.

**म. भा. भोसले यांचे वाङ्‌मयीन कर्तृत्त्व**

ग्रामीण जीवन हे ज्यांच्या लेखनाचे आस्था केंद्र आहे त्या लेखकाची साहित्यकृती ही लोकमानसाचा ठाव घेणारी लोककृती ठरते. याच स्वरुपाचे म. भा. भोसले गुरुजी यांचे साहित्य आहे. ग्रामीण भागात राहून ज्ञानदानात्मक कार्याद्वारे व सर्जनशील लेखणीद्वारे ग्रामीण वास्तवाचा आणि बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेणारे म. भा. भोसले गुरुजी हे ज्येष्ठ साहित्यिक म्हणून प्रसिध्द आहेत. ग्रामीण साहित्याच्या दृष्टिकोनातून एक वेगळा दृष्टिकोन त्यांनी आपल्या वाङ्‌मयीन कर्तृत्त्वातून जोपासला आहे.

म. भा. भोसले अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाट शोधीत होते. आजूबाजूचे कसलेही अनुकूल वातावरण व मार्गदर्शन नसताना त्यांनी आपली धडपड चालू ठेवली. याच काळात श्री. म. माटे, ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे यांनी ग्रामीण जीवन साहित्यात आणण्याचा प्रयत्न चालविला होता. या लेखकांना सर्व सुविधा उपलब्ध होत्या व मोठी परंपराही पाठीमागे होती.

यापैकी म. भा. भोसले यांच्या वाट्याला काहीच आले नाही. मात्र गुरुवर्य कृ. भा. बाबर यांनी त्यांच्यातला लेखक जागा केला. त्यांना मासिक, पुस्तक विकत घेऊन वाचण्याची सवय जडली.

१९३४-३५ मध्ये म. भा. भोसले यांनी ' किर्लोस्कर' या मासिकामधून फडके-खांडेकर यांच्या गोष्टी वाचून प्रथम कादंबरी लेखनास हात घातला. तो यशस्वी झाला नाही. परंतु त्या लेखनाची सवय मात्र झाली. त्यानंतर पुढे १९३७-३८ मध्ये त्यांनी ' आजोबांची डायरी ' ही त्यांची पहिल कथा मुंबईच्या ' निर्भीड ' या साप्ताहिकात प्रसिध्द झाली. या कथेपासूनच त्यांची लेखणी पुढे सरसावलेली दिसून येते. [१४] १९३२ ते १९४२ या कालावधीमध्ये त्यांनी जे जीवन पाहिले, अनुभवले व स्वत: प्रत्यक्ष पाहिले तेच त्यांनी ' समरांगण ' या कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला. या कादंबरीनंतर भोसले यांनी कथासंग्रह, कादंबऱ्या, नाटके, एकांकिका, बालनाट्य, समाजशिक्षण, नाट्यसप्तक अशा विविध साहित्य प्रकारांचे लेखन केलेले आहे.

म. भा. भोसले यांचे शिक्षण अपुरे असले तरी अनुभव विश्व फार मोठे होते. या अनुभव विश्वातूनच खेड्यातील सावकारशाहीवर कोरडा ओढणारी ' समरांगण ' (१९४१) ही कादंबरी लिहिली. वि. स. खांडेकर यांनी ती कोल्हापूरच्या मोघे प्रकाशक यांच्यामार्फत प्रकाशित केली. या कादंबरीमध्ये त्यांनी सावकारी अन्याय सहन करणारा शेतकरी कामगार परंतु याच सावकाराच्या दुष्कृत्याला प्रतिकार करणारा त्याचा मुलगा ' भगवान ' याचे चित्रण येते. या जीवन चित्रणाबद्दल एस. एम. जोशी यांनी भोसले यांचे अभिनंदन केले. या कादंबरीवरील परीक्षणे ' दैनिक केसरी ', ' नयन ', ' मन्वंतर ', ' मराठा ' यातून प्रसिध्द झाले. तसेच या कादंबरीस ग्वाल्हेरकर संस्थानिकांचे शंभर रुपयाचे बक्षिसही मिळाले. याच उमेदीने पुढे त्यांनी ' उघड्या जगात ' (१९४७) ही कादंबरी पूर्ण केली.

' उघडया जगात ' या कादंबरीने त्यांना प्रकाश झोतात आणले व ते खरेखुरे साहित्यिक झाले. वि. स. खांडेकर यांनी ' मनोहर ' मासिकात लेख लिहून या साहित्यकृतीचा व

म. भा च्या या यथोचित गौरव केला. पण या कादंबरी प्रकाशनाच्या बाबतीत त्यांना वाईट अनुभव आला. या कादंबरीच्या प्रकाशनासाठी अनेक प्रकाशकाचे उंबरठे झिजवले पण एकाही प्रकाशकाने ती कादंबरी हातातही धरली नाही. याबद्दल ते म्हणतात, " मराठीतल्या चारपाच प्रकाशकांना मी ती दाखवली पण चांगल्या कथेचे मर्म जाणण्याची अक्कल एकालाही नव्हती." [१५] हा विदारक अनुभव भोसल्यांनी जिव्हारी न लावता १९४२ साली ग्रामीण प्रकाशन धनगाव नावाची संस्था स्वत: स्थापन करुन आपले पुढचे सर्वच साहित्य त्यांनी या प्रकाशन संस्थेच्या माध्यमातूनच प्रकाशित केले.

त्या कादंबरीला प्रकाशक मिळाला नाही अशा ' उघड्या जगात ' या कादंबरीची निवड वामन कुलकर्णी यांनी चित्रपटासाठी केली. यावरच ' जिवाचा सखा ' हा चित्रपट तयार केला. या चित्रपटासाठी केलेल्या प्रयत्नातून त्यांना मोलाचे यश मिळाले. तसेच अनेक मान्यवरांनीही त्यामधून ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केल्याबद्दल भोसले यांचे कौतुकही केले.

१९४५ नंतरच्या नवकथेत व्यंकटेश माडगुळकरांनी ग्रामीण कथेत आपल्या आशय अनुभूतीने समृध्दता आणली होती. मात्र याच काळात भोसले यांनीही आपल्या स्वतंत्र शैली व तंत्राने मराठी साहित्य वर्तुळात स्थान मिळविले. याचाच प्रत्यय त्याच्या कथालेखनात दिसतो. १९४५ च्या दरम्यान ' किर्लोस्कर ', ' मनोहर ' या मासिकातून भोसले यांच्या काही कथा प्रसिध्द झाल्या. त्यामध्ये ' खिल्लारी जोडी ' ही कथा खूप गाजली. यापुढील कथा ' मन्वंतर ' या वृत्तपत्रातून प्रसिध्द होऊ लागल्या. भोसले यांनी ग्रामीण सामान्य माणसांच्या सुखदु:खाला प्राधान्य दिले. त्यांनी स्वत: शेतकरी, कामकरी यांचे जीवन जवळून पाहिले. प्रसंगी अनुभवले. शेतमजुरांच्या सुखदु:खाशी ते एकरुप झाले. त्यामुळे त्यांचे वास्तव चित्रण आपल्या कथेतून चित्रित केले. म्हणूनच औंदुबरच्या साहित्य संमेलनात प्रा. ग. प्र. प्रधान यांनी असे स्पष्टपणे नमुद केले की, " मराठी ललित साहित्यात ग्रामीण जीवन प्रथम आणणारे म. भा. भोसले हे लेखक आहेत." [१६] याचाच अर्थ नवकथेपूर्वीच्या कथेत म. भा. भोसले यांची कथा ग्रामीण वास्तवाचा आविष्कार करत होती.

म. भा. भोसले यांचा ' गार सावली ' हा पहिला कथासंग्रह १९४८ साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहाचे प्रकाशन प्राचार्य पानवलकर व ग. ल. ठोकळ यांच्या हस्ते झाले. या कथासंग्रहात ' खिल्लारी जोडी ', ' सखा गालात हसला ', ' भागिदारीण ' या पूर्व प्रसिध्द कथा समाविष्ट करण्यात आल्या. ग्रामीण वास्तवाचे रंगतदार चित्रण कथातून केले आहे. शेतकऱ्याचा जीव की प्राण असलेली बैलजोडी मालकाच्या दुर्बुध्दीमुळे विकली जाते. यातून होणाऱ्या वेदना या असह्य असतात. ' भागिदारीण ' कथेत पुरुषाच्या बरोबरीने काम करणारी धाडसी तरुणी ज्यावेळी संसारात भागिदारीण म्हणून येते. तेंव्हा संसार कसा फुलतो हे पहावयास मिळते.

याच दरम्यान १९४९ ला म. भा. भोसले यांचा दुसरा कथा संग्रह ' नांदाय जाते ' हा प्रकाशित झाला. यात मानवी जीवनाचे सूक्ष्म चित्रण घडविलेले दिसते. या कथा संग्रहाचे समीक्षण ' ज्ञानप्रकाश ', ' मनोहर ', ' दै. प्रकाश ' या वृत्तपत्रातून झालेले दिसते.

भोसले यांनी मराठी वाङमयात अनेक कथा, कादंबऱ्या लिहून भर घातली. त्यातीलच एक कादंबरी म्हणजे ' एका आईची लेकरं ' ही कादंबरी १९५० साली प्रकाशित झाली. अविनाशी अमर भावनाने कुटुंबातील जिव्हाळ्याचे दर्शन त्यांनी या कादंबरीतून घडविले. ठसठशीत व्यक्तिचित्रणाबरोबरच मनोविश्लेषणाला प्राधान्य देणारे कथानक या कादंबरीत रुजवले आहे. एकाच आईच्या पोटी जन्मलेल्या उत्कट प्रेम करणाऱ्या परंतु रागाच्या भरात एकमेकांपासून दूर झालेल्या व आतड्याच्या मायेने पुन्हा एकत्रित येणाऱ्या भावांची ही कथा आहे. 'गोजाक्का ' ही या कादंबरीचा आत्मा आहे. तीच या कादंबरीचे कथानक अखेरपर्यंत बोलते करुन हळूहळू वृध्दिंगत करताना दिसते.

' एका आईची लेकरं ' या कथेवर के. ना. कुलकर्णी यांनी जे परीक्षण केले त्यात ते म्हणतात, " ग्रामीण व नागर भाषेचा सुंदर समन्वय भोसले यांनी या कादंबरीत घातला आहे."[१७] यासारखी अनेक परीक्षणे ' दै. मन्वंतर ', ' दै. लोकसत्ता ', ' साप्ताहिक मौज', ' चिकित्सक ', ' मनोहर ', ' विविधवृत्त ' यातून केलेली दिसतात. १९५१ साली ज्या तीन

कादंबऱ्या सर्वोत्कृष्ट ठरल्या. त्यामध्ये ' एका आईची लेकरं ' या कादंबरीचा समावेश होता. म. ना. अदवंत यांनी पुणे आकाशवाणीवरुन या कादंबरीची रसग्राही समीक्षा केली. " म. भा. च्या या सत्व व संपन्न लेखन सामर्थ्याचा साक्षात्कार त्र्यं वि. सरदेशमुख सारख्या जाणकार समीक्षकानांही घ्यावा लागला. "[१८]

म. भ. भोसले यांचा जन्म ग्रामीण परिसरातच झाल्याने खेड्यातल्या जीवनाचे, कृष्णाकाठच्या मातीचे निष्ठेने व जिव्हाळ्याचे चित्रण त्यांनी ' अहेव लेणं ' (१९५१) या कथा संग्रहात केलेले दिसते. या संग्रहातील भाषा काळ्या जमिनीप्रमाणे सकस, पीळदार व सामान्य लोकांना समजेल अशी आहे. या कथासंग्रहानंतर चार वर्षांनी ' पाहुणेर ' हा कथासंग्रह (१९५५) साली प्रसिध्द झाली. या कथासंग्रहात विषयाचे नाविन्य, जीवनातील वास्तवता, जीवनानुभवाला प्राधान्य दिलेले दिसते.

यानंतरच्या कथेमध्ये जो वेगळा रंग आला तो १९६० साली ' पाझर ' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. तेंव्हा त्यातून ग्रामीण जीवनातील विविध पैलू दिसले. काळजाला भिडणारे संवाद वाचावयास मिळाले. तसेच ' बकुळा ' ही त्यांची कथा स्त्री सुलभ भाषा कशी असावी याचा उत्कृष्ट नमुना आहे. तसेच १९६३ साली भोसले यांचा ' ग्रामीण कथा ' हा निवडक कथासंग्रह प्रकाशित झाला. मानवी भावभावनांचे दर्शन, प्रेमाचा त्रिकोण, पराक्रमाची प्रेरणा देणारी स्त्री, अस्पृश्यता, हाडवैर, मुक्या प्राण्यांवरील प्रेम या गोष्टींना त्यांनी आपल्या कथेतून प्राधान्य दिले.

स्वांतत्र्यप्राप्तीनंतर जीवनाच्या कक्षा रुंदावणाऱ्या आणि रुंदावलेल्या कक्षेला अनुसरुन वास्तवाला सामोरी जाणारी वाङमयीन गुण वैशिष्ट्यांनी समृध्द कथा निर्माण होऊ लागली. ही अपेक्षा भोसले यांनी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. ' कथाजन्माची कथा ' हा त्यांचा कथासंग्रह (१९६३) प्रसिध्द झाला. त्यावेळी एक नवा प्रयोग केलेला दिसतो. जन्माला येणाऱ्या कथेसंबंधीची कथा त्यांनी या संग्रहातून सांगितली. ' आजोबांची डायरी ', ' खिल्लारी जोडी ', ' अहेव लेण ' या कथा कशा जन्मल्या यासंबंधीचे विवेचनही त्यांनी केले.

तसेच त्यावेळी त्या कथेमागील प्रेरणा स्पष्ट झालेल्या दिसतात. लेखनासाठी आई-वडिलांचे संस्कार, प्रचंड स्वरुपातील वाचन, आजूबाजूच्या गोष्टीचे सूक्ष्म निरीक्षण तसेच खांडेकर-फडके लेखन तंत्राचा प्रभाव त्याच्या कथा लेखनावर पडलेला दिसतो. आपल्या कथा लेखनाला विषय कोठून मिळाले व त्याचा प्रत्यक्ष जीवनाशी काय संबंध आला व त्यातून कथा कशी तयार होत गेली. या बाबतीत या ' कथा जन्माची कथा ' मधून त्यांनी आवर्जून सांगितले.

कथालेखनाबरोबर ज्या कादंबऱ्याही लिहिल्या त्यात १९६३ साली ' घसरगुंडी ' ही कादंबरी प्रसिध्द झाली. प्रचलित परिस्थितीवर लिहिलेली एक सामाजिक कादंबरी आहे. अशीच आणखी एक सामाजिक कादंबरी लिहिली ती ' कायापालट ' ही होय. ही कादंबरी १९६६ साली प्रकाशित झाली. या कादंबरीत एका प्रामाणिक प्राथमिक शिक्षकाने गाव विकासासाठी केलेली धडपड लक्षणीय आहे. म. भा. भोसले यांच्यामधील प्राथमिक शिक्षक पानापानावर दिसतो.

म. भा. भोसले यांचे वाङ्मयीन कर्तृत्त्व चौफेर आहे. याचे कारण म्हणजे त्यांनी कथा व कादंबरी बरोबरच नाट्यलेखनही केलेले दिसते. या नाटकातूनही ग्रामीण जीवनाचा वेध घेतलेला दिसतो. भोसले यांनी एकूण तीन नाटके लिहिली. ' रक्ताचं नातं ' (१९५१), ' पतीचा खून ' (१९५[illegible]) आणि ' लाडकी लेक ' ( १९५९). ' रक्ताचं नातं ' या नाटकाचा नाट्यलेखनाबरोबर गुरुजींनी काही प्रमाणामध्ये बालकांसाठी नाटिकाही लिहिल्या आहेत. त्यामध्ये ' नाट्यसप्तक ', ' जातीला जागा नाही ', 'नापास नगरी ', ' न यायच्या वाटेवर', ' भिकारी राजपुत्र ' या बाल नाटिकांमधून लहान मुलांच्यासाठी योग्य मार्गदर्शन केले आहे. ' नाट्यसप्तकामधून ' लहान मुलांच्यासाठी सात विनोदी नाट्यप्रवेश दिले आहेत तर ' जातीला जागा नाही ' ही एक शालेय संगीत विनोदी नाटिका आहे तर भिकारी राजपूत्र मधून मुलांना आवडेल अशी एक कथा सांगितली आहे. ग्रामीण परिसरामध्ये याही नाटिकांचे बरेच प्रयोग झाले. आटोपशीर व सुटसुटीत संवाद, साधी सोपी भाषा या गुणांमुळे ही नाटिका

आकर्षक ठरली आहे. या नाटिकेनंतर त्यांची बालनाटके लहान मुलांना प्रेरणादायी ठरले आहेत. ' चिमणचारा ' या पुस्तकातून मुलांच्या अंत:करणाला पेलतील अशा भाषेत विचार मांडले आहेत.

म. भा. भोसले यांनी आपल्या आयुष्यात शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात ग्रामीण वास्तवाला सामोरे ठेऊन ग्रामीण समाजमनाचे परिवर्तन घडविण्यासाठी ' समाजशिक्षण-मालेतून ' ' आमची वाडी ' (१९५१), ' काळीचा कोप ', ' हातचा घास ' (१९५५), गुणवंताची लेक (१९५७), ' हे ही दिवस जातील ' (१९७३), ' गेले ते दिवस ', ' खंडोबाची मुरळी ' (१९७४) ' आंधळ्याची काठी ' (१९७६), ' दुधाची धार ' (१९८६), ' बाळूबाई वाचनालय ' (१९९१) ही दहा पुस्तके लिहिली आहेत. यावरुन भोसले गुरुजी केवळ शिक्षकच नव्हते तर शिक्षणाच्या माध्यमातून विचारकृतीच्या धाग्यातून समाज जीवनाला एक नवे आयाम देणारे ते सामाजिक जीवनाच्या दृष्टीने जातीवंत समाजसेवक होते.

कादंबरी कथा व नाटक या प्रमुख प्रकारामध्येच भोसले यांचे साहित्य मर्यादित नव्हते. बाल वाङ्मयामध्ये त्यांनी बालवाचकांसाठी लेखन केले. ' चिमणचारा ' (१९५३), ' कुमारगीत ' (१९७७) ही प्रमुख पुस्तके त्यांनी बालकांसाठी लिहिली. तसेच म. भा. भोसले यांनी निबंध संग्रहही लिहिला. ' आधुनिक वाङ्मय प्रकार ' हे त्यांचे वेगवेगळ्या वाङ्मय प्रकाराविषयी त्यांनी विवेचन केलेले आहे. या पुस्तकाच्या दोन्ही भागात गद्य व पद्य यांचा इतिहास सांगितला आहे.

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, म. भा. भोसले यांच्या समग्र वाङ्मयीन लेखनावर दृष्टीक्षेप टाकला असता असे वाटते की, मराठी ग्रामीण वाङ्मय समृद्ध व बहारदार होण्यास म. भा. भोसले यांनीच पाया घातला. कथा, कादंबरी, नाटक व बालवाङ्मय याप्रमाणे समृध्द लेखन करुन आपले वाङ्मयीन कर्तृत्त्व चौफेर बनविले. या सर्व लेखन प्रकारामध्ये विशेषाने दिसते ते लेखकाच्या ग्रामीण परिस्थितीतील व्यक्तीच्या जीवनातील

ज्वलंत समस्या म्हणजेच त्यांनी आपली सारी प्रतिभा ग्रामीण कसदार साहित्य निर्मितीसाठी खर्ची घातली. ग्रामीण साहित्याच्या दिशा आणि कक्षा रुंदावण्याचे काम केले. शेवटपर्यंत त्यांनी ग्रामीणता हीच संकल्पना शब्दापासून ते हाडामासापर्यंत जपली.

## सारांश

१. ज्याला ' ग्रामीण साहित्य ' असे म्हंटले जाते. त्या साहित्यामध्ये ' कृषिसंस्कृतीचे' प्रतिबिंब उमटले असते. म्हणून ते संस्कार भेदाने नागर साहित्याहून वेगळे जाणवू लागते.

२. ' ग्रामीणत्त्व ' हे साहित्यातंर्गत प्रकट होणाऱ्या संस्कृतीचे निदर्शक असल्याने अशा साहित्यातील ग्रामीण संवदेनशीलता महत्त्वाची असते.

३. कादंबरीकार म. भा. भोसले यांचे व्यक्तिमत्त्व खेड्यामध्ये ग्रामसंस्कृतीच्या वातावरणात घडले. ते सात्विक व प्रेमळ वृत्तीचे शिक्षक होत.

४. किर्लोस्कर मासिकातील कथा वाचून त्यांना लेखनाची स्फूर्ती झाली व त्यातून त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, बालनाट्य इत्यादी सर्व साहित्य प्रकारातून लेखन केले.

५. म. भा. भोसले यांचा एकूण वाङ्मयीन परिचय लक्षात घेता त्यांच्या वाङमयाची प्रेरणा जरी वि. स. खांडेकर व तत्कालीन लेखकांचे लेखन ही असली तरी त्यांचा पिंड शेतकऱ्याचा होता आणि त्यांनी स्वतःला ग्रामीण लेखक म्हणवून घेतले आहे.

आता यापुढील प्रकरणात ' ग्रामीण संस्कृती आणि म. भा. भोसले यांचे कथात्मक साहित्य ' यांचा अभ्यास मांडावयाचा आहे.

# संदर्भ


१) कुलकर्णी, गो. म. : मराठी ग्रामीण साहित्य : परिसर आणि प्रवाह, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्र. आ. जानेवारी १९९९ पृ. क्र. ५.

२) यादव आनंद : ' ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३) कोत्तापल्ले नागनाथ : ' ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध ' : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, आ. जानेवारी १९८५ पृ. क्र. ७.

४) मुलाटे वासुदेव : ' ग्रामीण साहित्य स्वरुप व दिशा ' : कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ. क्र, ३०.

५) पाटील मोहन : मनोगत - ग्रामीण साहित्य आणि संस्कृती स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद. प. आ. जुलै २००२, पृ. क्र. ७.

६) कोत्तापल्ले नागनाथ : उनि, पृ. क्र. ८.

७) आत्रे, त्रि. ना. : ' गावगाडा ',वरदा बुक स्टॉल, आ.३ री, १९८१, पृ. ७.

८) जाधव, रा. ग. : दै. मराठा, ग्रामीण शहरी, २८ फेब्रु. १९६५.

९) भोसले म. भा. : ' कथाजन्माची कथा ' ग्रामीण प्रकाशन, धनगाव, १९६३ पृ. १४-१५.

१०) कुंभार प्रकाश (संपादक): जेष्ठ साहित्यिक म. भा. भोसले ' ग्रामीण साहित्याचे अग्रेसर मानकरी ', अध्यक्ष - म. भा. भोसले गौरव ग्रंथ समिती, कोल्हापूर, प्र.आ. एप्रिल २००६, पृ. क्र. ३४

११) भोसले म. भा. : ‘ कथाजन्माची कथा ’ उनि. पृ. क्र. १.

१२) भोसले म. भा. : ‘ कथाजन्माची कथा ’ उनि. पृ. क्र. १५.

१३) भोसले म. भा. : ‘ कथाजन्माची कथा ’ उनि. पृ. क्र. १५.

१४) कुंभार प्रकाश(संपादक): उनि, पृ. क्र. १९८.

१५) भोसले म. भा. : ‘ नांदाय जाते ’, ‘ मी जे पाहिले ’ पृ. क्र. १२७.

१६) कुंभार प्रकाश(संपादक): उनि, पृ. क्र. १८५.

१७) कुलकर्णी के. ना. : दै. प्रकाश, ४ फेब्रुवारी, १९५१ परीक्षण.

१८) कुंभार प्रकाश(संपादक) : उनि, पृ. क्र. १४४.